मन की बात 100

MANN KI BAAT 100

# मन की बात

## भाग २



# MANN KI BAAT
## VOL.2


**Authors**
Sharda Mohan and Shashi Mukherjee

**Illustrations and Cover Art**
Dilip Kadam

**Assistant Artist**
Ravindra Mokate

**Production**
Amar Chitra Katha

**Published by**
Amar Chitra Katha Pvt. Ltd

**Marathi**

ISBN – 978-81-19242-55-9

Amar Chitra Katha Pvt. Ltd, June 2023



© Ministry of Culture, Govt of India, June 2023
All rights reserved. This book is sold subject to the condition that the publication may not be reproduced, stored in a retrieval system (including but not limited to computers, disks, external drives, electronic or digital devices, e-readers, websites), or transmitted in any form or by any means (including but not limited to cyclostyling, photocopying, docutech or other reprographic reproductions, mechanical, recording, electronic, digital versions) without the prior written permission of the publisher, nor be otherwise circulated in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition being imposed on the subsequent purchaser.

You can now get ACK stories as part of your classroom with **ACK Learn**, a unique learning platform that brings these stories to your school with a range of workshops. Find out more at **www.acklearn.com** or write to us at **acklearn@ack-media.com**.



कोव्हीड १९ चा काळ संपूर्ण जगासाठी अत्यंत वाईट होता. महामारीशी दोन हात करण्यासाठी सक्तीने काही महिने आपण आपल्या कुटुंबासोबत घरातच राहिलो.

हा काळ काही लोकांसाठी चांगलाही ठरला. चोवीस तास घरी एकत्र राहिल्यामुळे पालक - मुलं, भावंडं एकमेकांच्या जवळ आली. नात्यांचं महत्त्व खऱ्या सगळ्यांना समजलं, पण काहींसाठी हा काळ कठीण होता. एकत्र राहण्याची सवयच मोडल्याने रोजची ही जवळीक त्रासदायक ठरू लागली.

भारतीय संस्कृतीत अशा काही परंपरा होत्या, ज्यांनी कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचं काम नेहमी केलं. दुर्दैवाने काळाच्या ओघात आपण या प्रथा विसरलो आणि त्यामुळेच अनेक कुटुंबांना एकत्र असण्यातला आनंद उपभोगताच आला नाही.

यातलीच एक परंपरा म्हणजे 'गोष्टी सांगणं'. आजी-आजोबांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकतांना कुटुंबामध्ये आपोआपच आनंद, उत्साह आणि एकीची भावना निर्माण व्हायची.

गोष्टींमुळे कलात्मकता आणि संवेदनशीलता वाढते. जिथे आत्मा, मन आहे, त्या प्रत्येक ठिकाणी गोष्ट आहे. तरुणपणी मी भारत भ्रमंती केली होती. गावोगावी फिरलो. मी गावातील लहान मुलांशी गप्पा मारायचो आणि त्यांना म्हणायचो, की मला एक गोष्ट सांगा.

त्यावर ती मुलं म्हणायची, "काका, गोष्ट नको. आम्ही तुम्हाला एक जोक सांगतो, मग तुम्हीही आम्हाला जोक सांगा." हे ऐकून मला धक्काच बसला. त्या मुलांना 'गोष्ट ऐकण्यातल्या' आनंदच माहित नव्हता. गोष्ट सांगण्याची परंपरा भारतात फार पूर्वीपासून आहे. पंचतंत्र, हितोपदेश, किस्सा गोई* या ग्रंथांमधील कथा केवळ मनोरंजनासाठी नव्हत्या, तर ज्ञान, तत्त्वनिष्ठ शिकवण्याचं ते एक माध्यम होतं.

आजकाल अनेक लोकांनी विविध माध्यमांतून गोष्टी सांगण्याचा उपक्रम सुरु केला आहे. अमर व्यास आणि त्यांच्या काही मित्रांनी मिळून 'Gaathastory.in' ची सुरुवात केली. वैशाली व्यवहारे देशपांडे शेतकरी बांधव आणि लोककथा सांगण्याचा प्रयत्न करतात. बंगलोरचे विक्रम श्रीधर महात्मा गांधीजींच्या कथा सांगतात. चेन्नईच्या श्रीविद्या वीरराघवन आणि Kathalaya.org च्या गीता रामानुजम या उत्कृष्ट कथाकथनकार आहेत.

आपण नायर सरांच्या शाळेत जाऊया, ते आपल्याला उत्तम कथाकथनकार आणि अनेक प्रेरणादायी व्यक्तींच्या गोष्टी 'मन की बात' या माझ्या कार्यक्रमातून सांगतात.



^Mahatma Gandhi

*उर्दू भाषेतल्या गोष्टी सांगण्याचा कलाप्रकार

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1 | गोष्टींच्या गोष्टी | 3 |
| 2 | वीरेंद्र यादव | 7 |
| 3 | उषा दुबे | 10 |
| 4 | टी. श्रीनिवासाचार्य | 13 |
| 5 | अनुदीप आणि मिनुषा | 15 |
| 6 | सलमान | 18 |
| 7 | एन. एस. राजाप्पन | 20 |
| 8 | सी. व्ही. राजू | 23 |
| 9 | भागीरथी अम्मा | 26 |
| 10 | राजेंद्र जाधव | 28 |
| 11 | गायत्री | 30 |

# गोष्टींच्या गोष्टी



उन्हाळ्याची सुट्टी संपवून सगळी मुलं शाळेत परत जाऊ लागली आहेत.
नमस्कार इक्बाल! अरे माझ्यासाठी थांब.
नमस्कार श्रेयस, मस्त वाटलं तुला भेटून.
सुप्रभात, नायर सर!
शुभ सकाळ शारदा, नमस्कार मुलांनो! मी तुम्हाला नेहमीप्रमाणे शेवटच्या तासाला भेटेन.
आणि भरपूर गोष्टी सांगाल ना?
हा हा हा, हो नक्कीच!
नायर सर विद्यार्थ्यांचे अत्यंत लाडके शिक्षक होते. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रेडिओवरील 'मन की बात' कार्यक्रमातील गोष्टी ते मुलांना सांगत असत.
शेवटच्या तासाला नायर सर हसत हसत वर्गात आले.
सर, आजची गोष्ट कोणाची आहे?
आजची गोष्ट ही गोष्टींबाबतच आहे.
म्हणजे? असं कसं सर?


सरांनी विद्यार्थ्यांना खाली बसण्याची खूण केली.
लॉकडाऊनच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बंगलोरमधील काही कथाकथनकारांशी संवाद साधला.
अपर्णा अत्रेय, शैलजा संपत, सौम्या श्रीनिवासन, अपर्णा जयशंकर आणि लावण्या प्रसाद या कथाकथनकारांशी त्यांनी गप्पा मारल्या. या सगळ्याजणींना गोष्टी सांगण्याची आवड आहे.
लावण्या प्रसाद तर घरातील ज्येष्ठांसोबत बसून त्यांनी सांगितलेल्या गोष्टी लिहून ठेवतात.
१५ ऑगस्ट १९४७! माझे आजोबा लहान होते आणि त्यांना अजूनही मुंबईत त्यांनी या दिवशी ट्राम मध्ये बसून मारलेली चक्कर आठवते. त्यादिवशी मुंबईत ट्रामसाठी कोणतेही तिकीट नव्हते.
माझे आजोबा भारतीय सैन्यात होते. भारत - चीन युद्धात ते लढले होते. या युद्धाच्या अनेक गोष्टी त्यांनी मला सांगितल्या आहेत.
मी सुद्धा माझ्या कुटुंबाबाबतच्या गोष्टी जाणून घेणार आहे.
ही खूप उत्तम कल्पना आहे. घरातील ज्येष्ठांना विचारून आपण अशा गोष्टी गोळा करूया आणि वर्गात एकमेकांना सांगूया. आज मी तुम्हाला ‘मन की बात’ कार्यक्रमात मी ऐकलेली एक गोष्ट सांगणार आहे.
हो सर!आम्हाला ऐकायचीच आहे गोष्ट!


राजा कृष्णदेवराय फार वैतागले होते.
पुन्हा त्याच भाज्या! दुधी भोपळा, बटाटा, लाल भोपळा! मला या भाज्यांचा कंटाळा आला आहे. आचाऱ्याला काहीतरी वेगळा स्वयंपाक करायला सांगा, नाहीतर मी त्याला फाशीची शिक्षा देईन.
URK!
बिचारा आचारी घाबरून राजाचे हुशार सल्लागार तेनालीराम यांच्याकडे गेला.
मी तयार केलेली कोणतीच गोष्ट मालकांना आवडत नाहीये. मला फाशी होईल.
शांत हो, माझ्याकडे एक युक्ती आहे.
दुसऱ्या दिवशी दुपारी राजा कृष्णदेवराय जेवायला बसले.
आजचा स्वयंपाक स्वादिष्ट असायलाच पाहिजे, नाहीतर...
आहा, उत्तम!
ही चविष्ट भाजी कोणती आहे?
सरकार, ही वांग्याची भाजी आहे. या भाजीनेसुद्धा तुमच्यासारखा राजेशाही मुकुट आणि जांभळा अंगरखा परिधान केला आहे.
आजपासून माझ्या राज्यात फक्त वांग्याचीच भाजी खाल्ली जाईल.
अं??
तेनालीराम यांची युक्ती कामी येतेय.



भाजीमंडईतून इतर भाज्या काढून टाकण्यात आल्या आणि टोपल्या भरून वांगी आणण्यात आली.
राजमहालात आणि घराघरांत वेगवेगळ्या पद्धतीने वांगीच शिजवली जाऊ लागली.
आज मी वांगी घालून सांबार तयार केलं आहे, उद्या वांग्याचं भरीत आणि परवा वांग्याचे लाडू करण्याचा प्रयत्न करणार आहे!
अरे वाह, मस्तच!
पण अगदी थोड्याच दिवसांत...
ही वांग्याची कोशिंबीर आहे.
स्वादिष्ट वांग्याची बिर्या...
बास! बंद करा हे! माझ्या राज्यात आजपासून वांगी निषिद्ध!
नंतर -
माझ्या जुन्या भाज्या आजपासून स्वयंपाकात परत आल्या आहेत, तुम्ही सांगितलेली युक्ती कामी आली.
हा, हा! राजाला कसं आनंदी ठेवायचं हे कळलं नाही तर माझी बुद्धी काय कामाची!




*पीक काढल्यानंतर शेतात उरणारा पालापाचोळा, पिकांची खुंटं

^Father




*एक यंत्र जे पेंढ्याला कॉम्पॅक्ट गाठी बनवते
^वनस्पती किंवा प्राण्यांचा कचरा जाळून मिळवलेली ऊर्जा

**कृषी उपक्रमांद्वारे विद्त उर्जा निर्माण करणारे कारखाने


अनेक शेतकऱ्यांनी वीरेंद्र यांच्या उपक्रमात सहभाग घेतला.
मी एक संस्था स्थापन करायचा विचार करतोय, त्या संस्थेच्या मदतीने आपण सरकारकडून कमी पैशात मशीन विकत घेऊ शकतो.
लवकरच त्याने एक संस्था स्थापन केली. सरकारकडून त्यांना योग्य ते सहाय्य मिळाले.
संपूर्ण राज्यात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली.
नमस्कार, मी कैथल जिल्ह्याचा उपायुक्त सुजन सिंग! तुमचं अभिनंदन!
बाळा, कृषी संवर्धन संस्थेचे अध्यक्ष करम चंद यांचा फोन आला होता, त्यांनी तुझं अभिनंदन केलं आहे.
उन्हाळ्यात पीक काढल्यानंतर वीरेंद्र २०० हून अधिक जणांना शेतात मदतीसाठी बोलावतात.
मला तुझा खूप अभिमान आहे. तू कचऱ्यातून पैसे कमावलेस.
हवा स्वच्छ झाली आहे याचा मला जास्त आनंद होतोय.
हो, तुझ्या आईची तब्येत आता सुधारतेय.
हवा स्वच्छ झाली आहे याचा मला जास्त आनंद होतोय. हो, तुझ्या आईची तब्येत आता सुधारतेय

# उषा दुबे



दिल्लीत कडाक्याचं ऊन होतं.
एवढ्या उन्हात शाळेत येणं म्हणजे त्रासच आहे.
हो ना! ऑनलाईन शाळा किती चांगली होती.
जेव्हा शाळा ऑनलाईन होती, तेव्हाही तू त्रासलेलाच होतास.
ऑनलाईन शाळा काही विद्यार्थ्यांसाठी चांगली होती, पण अनेकांना त्याचा त्रास झाला. आज मी तुम्हाला 'पुस्तकवाल्या ताई'ची गोष्ट सांगणार आहे.
कमाल! 'मन की बात'मधली गोष्ट!
कोव्हीड-१९ च्या काळात जेव्हा लॉकडाऊन घोषित करण्यात आलं, तेव्हा सिंगरौली, मध्य प्रदेशमधील उषा दुबे या शिक्षिकेला काळजी वाटू लागली.
ऑनलाईन शाळा? इथल्या मुलांकडे मोबाईल नाहीत, बऱ्याच घरांमध्ये इंटरनेट नाही. ते कसा अभ्यास करतील?
विद्यार्थ्यांनाही अनेक समस्या भेडसावू लागल्या.
तुझी शाळा कशी सुरु आहे महिमा?
मी ऑनलाईन शाळा चालू असताना लक्ष देण्याचा प्रयत्न करतेय बाई, पण सगळेच घरात असल्यामुळे लक्ष विचलित होतंय.


महिमा सिंग या विद्यार्थिनीशी बोलल्यानंतर उषा यांना एक अप्रतिम कल्पना सुचली.
महिमा, मुलं शाळेत जाऊ शकत नसतील, तर आपण शाळेलाच त्यांच्यापर्यंत नेऊया.
म्हणजे नक्की काय बाई?
चलता फिरता पुस्तकालय
आपल्याच स्कूटरवर उषा यांनी चालतं फिरतं पुस्तकालय तयार केलं.
ही खूप उत्तम संकल्पना आहे.
उषा आणि महिमा मुलांना शिकवण्यासाठी गावोगावी फिरू लागल्या.
माझ्यासाठी हे पुस्तक आणलसं म्हणून खूप खूप धन्यवाद ताई!
आपल्या पचनसंस्थेत अन्न कसं पचतं हे तुमच्या लक्षात आलं का मुलांनो?
हो! आम्हाला मागच्या आठवड्यात हे ऑनलाईन शिकवलं होतं, पण त्यादिवशी आमच्याकडे इंटरनेट नीट नव्हतं, त्यामुळे यातला काही भाग मला समजला नव्हता.
महिमा ताई, मी हे नीट सोडवलं आहे का?
हो, शाब्बास!













*'पुस्तकांसह बहन' हिंदीत

^धैर्याला सलाम

# टी. श्रीनिवासाचार्य


संगणकाचा तास सुरु होता.
सगळे रकाने एकत्र सिलेक्ट केल्यानंतर त्या आकड्यांची बेरीज तुम्हाला खाली दिसेल.
हो, सर.
मला संगणकाचं कधी समजेल असं वाटत नाहीये.
मन लावून एखादी गोष्ट केली, तर काहीच कठीण नसतं सुजित. आज मी तुम्हाला श्रीनिवासाचार्य यांची गोष्ट सांगणार आहे. वयाच्या ८०व्या वर्षी ते संगणक वापरायला शिकले.
मस्त!
टी. श्रीनिवासाचार्य मायलापोर, चेन्नई येथील विष्णू मंदिरात पुजारी होते. संस्कृतवर त्यांचं प्रभुत्व होतं. एके दिवशी -
स्वामी, मला मंत्र आणि विधी लक्षात राहत नाहीयेत.
विधींवरील हे पुस्तक तुला मदत करेल.
श्रीनिवासाचार्य यांनी धार्मिक विधींवर काही पुस्तके लिहिली होती.
हे घे, 'पद्मतंत्र प्रयोगम्'! या पुस्तकात सगळ्या विधींची माहिती आहे.
धन्यवाद स्वामी! मला नक्कीच मदत होईल.
लवकरच सगळ्या शिष्यगणांमध्ये श्रीनिवासाचार्य यांचे पुस्तक लोकप्रिय झाले.
एके दिवशी-
स्वामी, नुकतीच सरकारने घोषणा केली आहे, की तुम्ही लिहिलेली दोन पुस्तके तमिळनाडूमधील मंदिरांमध्ये वाटली जाणार आहेत.
अरे वा! मी या विषयावर अजून पुस्तकं लिहिण्याचा प्रयत्न करेन.




* तमिळ भाषेत वडील

^ तमिळ भाषेत आजोबा

# अनुदीप आणि मिनुषा



आज वर्ग स्वच्छ दिसत नाहीयेत. बाहेरचा परिसर सुद्धा अस्वच्छ आहे.
स्वच्छता करणाऱ्या ताई आजारी आहेत सर. गेले २ दिवस त्या येत नाहीयेत.
आम्ही आमचा वर्ग स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला, पण शाळा एवढी मोठी आहे. आम्ही संपूर्ण शाळा कशी स्वच्छ करू?
जर तुम्ही सगळे एकत्र आलात, तर शाळा स्वच्छ करणं सोप्पं काम आहे. मी तुम्हाला अनुदीप आणि मिनुषाची गोष्ट सांगतो. त्यांनी तर संपूर्ण समुद्रकिनारा स्वच्छ केला. मा. पंतप्रधानांना देखील ही गोष्ट प्रेरणादायी वाटली.
नोव्हेंबर २०२० मध्ये ब्यंदूर, कर्नाटक येथे अनुदीप हेगडे आणि मिनुषा कांचन यांचं लग्न झालं.
सुखी रहा!
कोव्हीड १९ असूनही हा सोहळा उत्तम पार पडला.
लवकरच -
मी विचार करत होतो, की आपण हनिमूनसाठी लक्षद्वीपला जाऊया.
मला हिमाचलला जायची इच्छा होती, पण कोव्हीडमुळे सध्या प्रवास करणं धोक्याचं आहे.
कुठेच जायला परवानगी नसल्याने, या जोडप्याने रोज संध्याकाळी जवळच्या सोमेश्वर समुद्रकिनाऱ्यावर जायचे ठरवले.
मला इथे खूप छान वाटतं.
हो ना. सूर्य, वाळू आणि पाणी बघून असं वाटतं, की लॉकडाऊन इतकंही वाईट नाहीये.




*कर्नाटकातील कुंदपूर तलाव काही नागरिकांनी एकत्र येऊन स्वच्छ केला. दर रविवारी ते हा स्वच्छता उपक्रम राबवत होते.


काही दिवसानंतर -
अरे वा! आपण बऱ्यापैकी किनारा स्वच्छ केला आहे.
हो, पण लोकांनी मदत केली तर अजून करता येईल.
माझ्याकडे एक कल्पना आहे.
अनुदीपने त्यांच्या प्रकल्पाविषयी सोशलमीडियावर माहिती अपलोड केली.
लवकरच -
मी मंजुनाथ
मी हसन. आम्ही तुमच्या स्वच्छता प्रकल्पात सहभागी व्हायला आलो आहोत.
मस्त!
अनेक लोकांनी येऊन या स्वच्छता मोहिमेला हातभार लावला.
त्यांनी जवळपास ८०% समुद्रकिनारा स्वच्छ केला आणि ८०० किलो कचरा गोळा केला.
आता किनारा किती छान दिसतोय ना?
हो, किनाऱ्याला नवं रूप मिळालंय.
काही दिवसांनी -
आपण अजून बरंच काही करू शकतो. स्थानिक मच्छीमारांना आपण सागरी जैवविविधता समजावणारे चित्रपट दाखवूया का?
हो. आताशी तर सुरुवात आहे. आपल्याला अजून बरंच काम करायचं आहे.
अनुदीप आणि मिनुषा अशी अनेक चांगली कामं करत आहेत. 'एकत्र येऊन आपण समाजात बदल घडवू शकतो' हे त्यांचं ब्रीदवाक्य आहे.

# सलमान



सर, माझ्या काकांनी एका अपघातात त्यांचा पाय गमावला. आता ऑपरेशन करून त्यांना कृत्रिम पाय बसवला आहे, पण त्यांना अजूनही नीट चालता येत नाहीये.
त्यांना थोडा वेळ लागेल सुजित.
एका धावपटूने कृत्रिम पायाच्या मदतीने अनेक स्पर्धा जिंकल्या आहेत.
खरं आहे पारुल, कृत्रिम अवयव असूनही त्यावर मात करत अनेक खेळाडूंनी यश मिळवलं आहे. आजची गोष्ट सलमानविषयी आहे. त्यांना चालता येत नसतानाही ते एक यशस्वी उद्योजक झाले.
सलमान यांचा जन्म उत्तरप्रदेश मधील हमीरपूर या ठिकाणी झाला. ते लहान असताना एकदा -
सलमानला खूप ताप चढला आहे, तो सतत रडतोय.
आपण त्याला हॉस्पिटलमध्ये नेऊया
लगेचच -
सलमानला पोलिओ झाला आहे. त्याच्या स्नायूंमधील ताकद हळूहळू कमी होईल. कदाचित त्याला चालता येणार नाही.
अरे देवा, हा उरलेलं आयुष्य कसं जगेल?
सलमानच्या पायांमधील ताकद कमी होऊ लागली, पण इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने बारावीची परीक्षा दिली.
मला आता स्वावलंबी व्हायचं आहे आई, मी सरकारी खात्यामध्ये नोकरीसाठी अर्ज करतो.


अथक प्रयत्न करूनही त्याला कुठेच नोकरी मिळाली नाही. एके दिवशी -
कोणालाच मला नोकरी द्यायची नसेल, तर मी स्वतःची कंपनी सुरु करतो.
काही वर्षात सलमानने स्लीपर्स आणि डिटर्जंट तयार करण्याची प्रक्रिया समजून घेतली. कर्ज घेऊन त्याने 'टार्गेट' नावाची कंपनी सुरु केली.
या, मी तुम्हाला स्लीपर्स कशा तयार होतात ते दाखवतो.
लवकरच ही कंपनी नावारूपास आली. एके दिवशी -
एका अपघातात मी माझा खांदा गमावला, मला कुठेच नोकरी मिळत नाहीये. तुम्ही मला काम देऊ शकता का?
बघूया. तुलाही काम करण्याची आणि यशस्वी होण्याची योग्य संधी मिळाली पाहिजे.
पुढील दोन वर्षात सलमानने अनेक दिव्यांग व्यक्तींना कामाची संधी उपलब्ध करून दिली.
आता ३० दिव्यांग व्यक्ती आपल्या कंपनीत काम करत आहेत. दिव्यांग लोकांना कामाची संधी देण्याचा माझा विचार आहे.
सलमान यांची गोष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या 'मन की बात' कार्यक्रमात सांगितली.
सलमान भाई, तुमच्या धैर्यशील वृत्तीचं पंतप्रधानांनी कौतुक केलं.
हो ना, आम्हाला तुमचा अभिमान आहे.
धन्यवाद!

# एन.एस. राजाप्पन










* केरळमधील प्रसिद्ध तलाव व प्रसिद्ध पर्यटनस्थळ


राजाप्पन यांनी बोट वल्हवायला सुरुवात केली.
प्लास्टिकचे मासे? मी सुद्धा त्यांना बघू शकतो का?
नक्कीच! बस
लवकरच -
हे बघ, प्लास्टिकच मासे! चला तुम्हाला इथून बाहेर काढूया.
अरे, हे आहेत का मासे
काही तासांनी -
तलाव आता खूप स्वच्छ दिसतोय. तुम्ही खूप शूर आहात. तुम्हाला... तुम्हाला
मला पाय नसले तरी ना? हा हा, पाय नसले तरी बोटिंग मला जमतं. मी प्लास्टिक तलावातून काढतो आणि त्यातून पैसेही कमवतो.
दुपारी, जेवणासाठी त्यांनी थोडावेळ विश्रांती घेतली.
तुम्ही किती वर्ष हे काम करत आहात?
५ वर्ष झाली, पण माझी काही तक्रार नाही. स्वच्छ तलाव बघणं मला सुखावतं.
तुम्ही खूप निःस्वार्थी आहात.


काही तास स्वच्छता केल्यानंतर राजाप्पन यांनी बोट किनाऱ्यावर आणली.
आता तुम्ही काय करणार आहात?
मी आता या कचऱ्याचं वर्गीकरण करेन. हा कचरा पुन्हा पाण्यात जाऊ नये याची काळजी घेईन. तू सुद्धा येतोस का माझ्यासोबत?
हो.
लवकरच -
राजाप्पन सर, मी तुम्हाला प्लास्टिक गोळा करण्यात उद्याही मदत करू का?
हो, कर की! आपण एकत्र काम केलं, तर बदल लवकरच दिसेल.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात राजाप्पन यांच्या प्रयत्नाचे कौतुक केले.
राजाप्पन, आमच्याकडे तुमच्यासाठी सरप्राईज आहे.
सर, आम्ही तुमच्यासाठी एक नवीन मोटर बोट आणि व्हीलचेअर आणली आहे.
या नवीन मोटर बोटचा वापर करून राजाप्पन वेंबनाड आणि इतर अनेक तलाव स्वच्छ करतात.

# सी. व्ही. राजू




*आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम जिल्ह्यातील एक गाव


राजू महाविद्यालयात जाऊन आल्यानंतर गोष्टी बदलल्या होत्या.
ही मुलं प्लास्टिकची खेळणी का खेळत आहेत?
ही खेळणी स्वस्त आहेत. गावातील खेळणी तयार करणारे कामगार नवीन व्यवसायांसाठी गाव सोडून जात आहेत.
राजू महाविद्यालयात जाऊन आल्यानंतर गोष्टी बदलल्या होत्या. ही मुलं प्लास्टिकची खेळणी का खेळत आहेत? ही खेळणी स्वस्त आहेत. गावातील खेळणी तयार करणारे कामगार नवीन व्यवसायांसाठी गाव सोडून जात आहेत.
यांनी खेळणी तयार करणाऱ्या कलाकारांसाठी 'पद्मावती असोसिएट्स' नावाची सहकारी संस्था उभारली.
खेळणी तयार करणं ही आपल्या गावाची ओळख आहे, आपण ती गमावणार आहोत का?
त्यांना बाजारात स्पर्धेचा सामना करावा लागला, पण त्यांनी चिकाटी सोडली नाही.
अंकुडू लाकूड हे मऊ असतं. फार न तोडता आपण त्याला आकार देऊ शकतो.
आपण वनविभागाशी संपर्क साधून जास्तीत जास्त अंकुडू लाकूड मिळवूया.
भरपूर प्रमाणात खेळणी तयार झाल्यानंतर, राजू यांनी जत्रांमध्ये, प्रदर्शनांमध्ये ही खेळणी नेली.
मला काही खेळणी भारताबाहेर पाठवायची आहेत.
मस्त! ही आपल्यासाठी मोठी संधी आहे.
पण हा आनंद फार काळ टिकला नाही. त्यांची ऑर्डर परत पाठवण्यात आली.
खेळण्यांवरील रंगामध्ये काही प्रमाणात शिसं आहे, त्यामुळे आपली ऑर्डर परत आली.
आधुनिक कृत्रिम रंगांचा हा तोटा आहे.
आता पारंपरिक पद्धतच वापरायला हवी.




*A geographical indication (Gi) tag denotes products that possess qualities or a reputation that come from their place of making.

^चौथा सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्कार

# भागीरथी अम्मा


आनंदाची बातमी आहे! लवकरच मी वनस्पतीशास्त्राची परीक्षा देणार आहे. त्यानंतर आपण जंगलात फिरायला गेलो, की मी तुम्हाला विविध रोपांची माहिती देऊ शकेन.
तुम्ही शिकताय सर? हे कसं शक्य आहे?
शिक्षक पण शिकतात हे मला माहीतच नव्हतं.
हो तर, मोठी माणसं पण शिकू शकतात. अलीकडेच 'मन की बात' कार्यक्रमात मी १०५ वर्षांच्या एका आजींची गोष्ट ऐकली. त्यांनी वयाच्या १०५व्या वर्षी परीक्षा दिली.
बरोबर शारदा! त्यांचं नाव भागीरथी अम्मा! बसा मुलांनो, मी तुम्हाला त्यांची गोष्ट सांगतो.
भागीरथी अम्मा केरळमधील प्रक्कुल्म गावी रहायच्या. त्यांना वाचनाची- लिखाणाची खूप आवड होती, परंतु दुर्दैवाने त्या आठ वर्षाच्या असताना त्यांच्या आईचे निधन झाले.
तू शाळेत येणार नाहीयेस का भागीरथी?
मला शिकायचंय.
पण तुला आता तुझ्या भावंडांचा सांभाळ करावा लागेल.
भागीरथीला नंतर शाळेत जाताच आले नाही. पुढे त्यांचे लग्न झाले आणि त्यांना सहा मुलं झाली. त्यानंतर त्यांच्या पतीचे निधन झाले.
तुमच्या शिक्षणाच्या आड मी कोणतीच गोष्ट येऊ देणार नाही.
अम्मा, आम्ही खूप शिकू, तुला आमचा अभिमान वाटेल.
त्यांची मुलं मोठी झाल्यानंतर -
मी हे पुस्तक वाचू का? तुम्ही माझी मदत कराल का?
नक्कीच अम्मा
अम्मा, आधी हे पुस्तक वाच. हे छान आहे.


पण भागीरथी अम्मांचं शिकण्याचं स्वप्न अर्धवटच राहीलं होतं. त्या १०५ वर्षांच्या झाल्यानंतर -
अम्मम्मा हे बघ, केरळ सरकारच्या साक्षरता विभागाने ज्येष्ठांसाठी शिक्षणाची योजना आखली आहे.
मी शिकू का? ही संधी माझ्यासाठीच असेल.
वयाचा विचार न करता भागीरथी अम्मांनी शिक्षण घ्यायचं ठरवलं.
मला खूप अभ्यास करायचा आहे.
तू नक्कीच छान अभ्यास करशील अम्मम्मा! आम्ही आहोत तुझ्यासोबत.
अनेक महिने अभ्यास केल्यानंतर भागीरथी अम्मांनी गणित, परिसरशास्त्र आणि मल्याळी भाषेची परीक्षा दिली.
लवकरच -
अम्मम्मा, तू करून दाखवलंस! तुला २७५ पैकी २०५ गुण मिळाले आहेत.
मी तुम्हाला म्हणाले होते, मी वयस्कर झाले असेन, पण माझी शिकण्याची इच्छा अजूनही तितकीच तीव्र आहे.
२०१९ साली, भागीरथी अम्मांना महिलांना दिल्या जाणाऱ्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने म्हणजेच 'नारी शक्ती पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.
मन की बात
आयुष्यात यश मिळवायचे असेल, तर सतत काहीतरी नवीन शिकत राहिले पाहिजे.

*मल्याळी भाषेत आजी



राजेंद्र जाधव
आता कोव्हीड-१९ चा धोका कमी झाला आहे हे ऐकून किती छान वाटतं ना?
हो सर, या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी झटलेल्या कोव्हीड योध्यांचे आपण आभार मानले पाहिजेत.
अर्थात, आरोग्यसेवेत काम करणाऱ्या प्रत्येकाबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. आज मी तुम्हाला 'राजेंद्र जाधव' यांची गोष्ट सांगणार आहे.
ही गोष्ट 'मन की बात' मधली आहे का?
नायर सरांनी होकारार्थी मन डोलावली.
महाराष्ट्रातील सटाणा गावी ६२ वर्षांचा एक माणूस नाराजीने दूरदर्शनवरील बातम्या बघत होता.
नाशिक कोव्हीड-१९ मधील रेड झोन मध्ये आलं आहे.
माझं गाव संकटात आहे.
तो माणूस होता राजेंद्र जाधव. ते अभियंता आहेत. कृषीविषयक साधनं ते तयार करतात.
हात स्वच्छ धुवा आणि चेहऱ्यावर मास्क लावा.
मोठ्या पातळीवर स्वच्छता करणं गरजेचं आहे. लहान पातळीवर काम करून भागणार नाही.




नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन ही संस्था तंत्रज्ञानाच्या मदतीने नवीन प्रयोग करून यंत्र टायर करणाऱ्या माणसांना प्रोत्साहन देते.

# गायत्री




*माहिती तंत्रज्ञान




*गायत्रीचे वडील, काशीलिंगम, यांत्रिक अभियंता होते.


हे पाईप कशासाठी आहेत? आपण पट्ट्याला चाकं लावू शकतो.
मी पाईपच्या मदतीने कृत्रिम पाय तयार करतोय, म्हणजे वीराला चालताना मदत होईल.
चालेल. पाय लावताना आपण मऊ पॅडिंग करूया, म्हणजे त्याला त्रास होणार नाही.
लवकरच -
आता आपण याची चाचणी घेऊन बघूया. वीरा, अजिबात हालचाल करू नकोस.
काही दिवसांच्या सरावानंतर -
वीरा हालचाल करतोय.
तो अगदी आरामात पळू शकतोय.
अरे वाह, हा किती मस्त पळतोय!
हम्म, त्याने खूप प्रयत्न केले आहेत.
अनेक लोकांनी अशा जखमी कुत्र्यांना दत्तक घेऊन त्यांचं आयुष्य सुधारण्याचा प्रयत्न करावा असा आशावाद गायत्री व्यक्त करते.



# मन की बात

## भाग २

मन की बातच्या दुसऱ्या भागातही पहिल्या भागाएवढ्याच प्रेरणादायी गोष्टी आहेत.

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या रेडिओवरील कार्यक्रमात अनेक प्रेरणादायी महिला आणि पुरुषांच्या गोष्टी सांगितल्या आहेत. हे खरे तारे आहेत.

भावंडांकडे लक्ष देण्यासाठी भागीरथी अम्मांनी शाळा सोडली, पण पणजी झाल्यानंतर त्यांनी अभ्यासाला सुरुवात केली आणि १०५ वर्षांच्या असताना त्यांनी चौथ्या इयत्तेची परीक्षा दिली.

एन. एस. राजाप्पन यांना वयाच्या पाचव्या वर्षी पोलिओने ग्रासले, पण त्यावर मात करून ६३ व्या वर्षी त्याची वेंबनाड तलाव स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली.

कोव्हीडमध्ये उषा दुबे यांना जाणवलं, की ऑनलाईन शिक्षण गरीब मुलांना शक्य नाही, म्हणून त्यांनी फिरती शाळाच गरीब मुलांपर्यंत नेली.

बदल घडवण्यासाठी पैसा किंवा सत्ता नाही, तर इच्छाशक्ती लागते हे या व्यक्तींनी आपल्या आचरणातून सिद्ध केलं.



₹90

www.amarchitrakatha.com
ISBN 978-81-19242-55-9
9 788119 242559